RNI NO. MAHMAR/2020/84035




# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ




रविवार, १६ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ८० | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 16 March 2025 | Year : 5 | Issue : 80 | Daily | Rate: Rs. 5/-




## तर भारताला काहीही भवितव्य नाही : पलानीवेल थियागा राजन

**जर उत्तरेकडेच्या गरीब आणि भरमसाठ लोकसंख्या असणाऱ्या राज्यांच्या परिस्थितीत सुधारणा झाली नाही, त्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली नाही तर या देशाला काहीही भवितव्य नाही. हे वास्तव आहे. मुद्दा हा आहे की आम्ही राज्य सरकार असल्यामुळे आम्ही ही स्थिती सुधारू शकत नाही. आणि जो पक्ष केंद्रात सत्तेत आहे, त्या पक्षाने यावर लक्ष केंद्रीत करण्याऐवजी आमचे महत्त्व कमी करणे, आम्हाला लक्ष्य करणे, आम्हाला धमकावणे, आमच्याकडून निधी उकळणे, आम्हाला ब्लॅकमेल करणे यावर लक्ष केंद्रीत केले आहे, अशी टीका राजन यांनी भारतीय जनता पक्षावर केली.**

**चैनई :** राष्ट्रीय शिक्षण धोरण व मतदारसंघ पुनर्रचनेवरून सध्या केंद्र सरकार व दक्षिणेकडील राज्यांमध्ये मतभेद पाहायला मिळत आहेत. विशेषतः तामिळनाडू राज्यातून केंद्र सरकारच्या धोरणाला मोठा विरोध होताना दिसत आहे. त्यातच तामिळनाडूने नुकत्याच सादर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात रुपयाचे चिन्हच बदलून ते तामिळ भाषेत केले. त्यामुळे यावरून राजकीय दावे-प्रतिदावे होत असतानाच आता तामिळनाडू सरकारमधील एका वरीष्ठ मंत्र्यांनी भाजपाशासित केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. तामिळनाडूचे माजी अर्थमंत्री व विद्यमान माहिती व तंत्रज्ञान खात्याचे मंत्री पलानीवेल थियागा राजन यांनी केंद्र सरकारला उत्तरेकडील राज्यांच्या विकासाकडे लक्ष देण्याचा सल्ला दिला आहे. केंद्र सरकारने आम्हाला धमकावण्याऐवजी उत्तरेकडेच्या राज्यांच्या विकासाकडे लक्ष द्यायला हवे, असे राजन म्हणाले आहेत. त्यांचे हे विधान पुन्हा एकदा केंद्र व तामिळनाडू यांच्यातील वादाचे कारण ठरण्याची शक्यता आहे. देशातल्या श्रीमंत राज्यांमधून गरीब राज्यांकडे वळवल्या जाणाऱ्या पैशाचे प्रमाण वाढले आहे. दुसरीकडे दोन्ही राज्यांमधील ही आर्थिक दरी वाढतच आहे. जेव्हा सध्याचे मोदी सरकार सत्तेत आले, तेव्हा तामिळनाडूला दिल्या जाणाऱ्या प्रत्येक 1 रुपये मूल्याच्या योजना व अनुदानामागे उत्तर प्रदेशला 2 रुपये 90 पैशांच्या योजना मिळत होत्या. 2024 पर्यंत हे प्रमाण थेट 4 रुपये 35 पैशांपर्यंत वाढले आहे, असा दावा राजन यांनी केला. एवढा पैसा खर्च करूनही उत्तर प्रदेशमधील दरडोई उत्पन्नात घटच झाली आहे.

## फॅसिझम आणि भांडवलशाहीमुळे देश वेगळ्या वळणावर : हर्षवर्धन सकपाळ



**सावंतवाडी :** धर्माच्या नावाखाली भांडवलदारांचे हित साधले जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाला राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा विरोध आहे. तसेच फॅसिझम आणि भांडवलशाहीमुळे देश वेगळ्या वळणावर आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षच देशाला न्याय मिळवून देऊ शकतो असा विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

सिंधुदुर्ग दौऱ्यावर आलेल्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ सावंतवाडी मध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. ते म्हणाले, फॅसिझम आणि भांडवलशाहीमुळे देश वेगळ्या मार्गावर चालला आहे, त्यामुळे देशाची संस्कृती, परंपरा व विचारांचे रक्षण करण्यासाठी येणाऱ्या काळात काँग्रेस आक्रमकतेने लढणार आहे. राहूल गांधी हा चेहरा प्रधानमंत्री नरेंद्र मोदीपेक्षा जास्त पटलावर असून भविष्यात हाच चेहरा काँग्रेससाठी आशेचा किरण ठरेल असा आशावाद काँग्रेसचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, भाजपाने मंत्री नितेश राणे यांना समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी मंत्रिमंडळात घेतले आहे. कोकणाला थोर विचारवंत, समाजसुधारक, स्वातंत्र्यसेनानी, लेखक, साहित्यिक लाभले आहेत. त्यामुळे नितेश राणे यांच्या वाचाळ पणामुळे कोकणची महाराष्ट्रात बदनामी होत आहे.

काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर श्री सपकाळ यांनी प्रथमच सिंधुदुर्ग जिल्हा दौरा केला. या ठिकाणी कार्यकर्त्यांची मेळाव्याच्या माध्यमातून ते संपर्क साधणार आहे आज सावंतवाडी येथे ते दाखल झाल्यानंतर त्यांनी सुरुवातीला काँग्रेसचे नेते स्वर्गीय भाईसाहेब सावंत समाधीस्थळी भेट देऊन त्यांना अभिवादन केले त्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वकील दिलीप नार्वेकर यांच्या निवासस्थानी त्यांनी पत्रकार परिषद घेतली.

## बुद्ध गया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन नाशिक येथे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**नाशिक :** भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्य शाखा आणि नाशिक जिल्हा शाखा या दोन प्रतिनिधी मंडळाने नाशिक जिल्ह्याधिकारी यांना निवेदन देऊन बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्त करावे यासाठी बुद्धगया टेम्पल कायदा 1949 मध्ये सुधारणा करावी अशी मागणी राष्ट्रपती, प्रधानमंत्री, बिहारचे राज्यपाल व मुख्यमंत्री यांना करण्यात आली. या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष किशोर बच्छाव, महाराष्ट्र राज्य सल्लागार अनिल वैद्य (माजी न्यायाधीश) नाशिक, महासचिव पंकज खरे, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष वाय. डी. लोखंडे, भन्ते प्रज्ञारत्न शाक्यवंश, भन्ते बुध्दरत्न, शाम पगारे, जिल्हा शाखा अध्यक्ष संजय भरीत, गुणवंत वाघ, बबन काळे, आर. आर. जगताप, बाळासाहेब सिरसाठ, ॲड. सहारे, शिवाजी काळे, अशोक गांगुर्डे, संदेश पगारे, सिद्धार्थ भालेराव, संजय नेटावटे जिल्हा उपाध्यक्षा मंदाकिनी दाणी, जयश्री गांगुर्डे, सत्यभामा वाळवंटे, संगिता गांगुर्डे, करुणा मगर, राजेंद्र मगर, हेमंत वाळवंटे, परार्डे, उत्तम गायकवाड, नंदु काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## जिच्या हाती शिक्षणाची दोरी ती जगाला उद्धारी : प्रा. संध्या राजूरकर

# अंधश्रद्धेच्या बेड्या तोडून महाराष्ट्र अंनिसच्या महिला परिषदेचे उद्घाटन




**नागपूर :** महिलांनो विवेकवादी व्हा, विज्ञान वादी व्हा, वैज्ञानिक दृष्टिकोन मनात रुजवा. मुलांना शिकवा? जागृतीसाठी शिक्षणाची नितांत गरज आहे. जिच्या हाती शिक्षणाची दोरी ती जगाला उद्धारी 'असे विचार दै.बहुजन सौरभ च्या निवासी संपादक प्रा. संध्या राजूरकर यांनी व्यक्त केले. त्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यव्यापी महिला परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षपदावरून बोलत होत्या.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यव्यापी महिला परिषदेचे दोन दिवसीय आयोजन समाज कल्याण विभाग व अंनिस यांचे संयुक्त विद्यमाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनेशनल कन्व्हेनशन सेंटर कामठी रोड नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध सामाजिक विचारवंत रविंद्र रुक्मिणी पंढरीनाथ यांच्या हस्ते झाले असून मंचावर ज्ञानेश्वर रक्षक गुरुदेव सेवा मंडळ, बाबासाहेब देशमुख उपायुक्त समाज कल्याण विभाग तसेच सुकेशिनी तेलगोटे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग नागपूर उपस्थित होते. मान्यवरांच्या स्वागतानंतर या महिला परिषदेचे उद्घाटन अनोख्या पद्धतीने करण्यात आले. महिलांनी भूतबाधा, नक्षबळी, वृतवैकल्यें, तंत्र मंत्र, चेटूक अंधश्रद्धा यांच्या बेड्या अंगावर ठोकल्या व उद्घाटक रविंद्र पंढरीनाथ व इतर मान्यवरांनी त्या तोडल्या व उद्घाटन केले. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राच्या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या महिला परिषदेची प्रस्तावना करतांना ॲड. मुक्ता दाभोलकर म्हणाल्या कि उपवासापेक्षा आपुलकीची व क्रोधापेक्षा करुणेची गरज आहे. अंधश्रद्धा निर्मूलना साठी महिलांनी अधिकाधिक महिला जोडाव्या कारण महिलाच अंधश्रद्धेच्या बळी ठरतात व वाहक होतात. कार्यक्रमाचे संचालन प्रिती नगराळे यांनी केले.

या प्रसंगी उत्कृष्ट ट्रायबल आर्ट्स, वारली आणि गोंडी पेंटिंग यासाठी महाअंनिस भंडारा शाखेचे डॉ. वामन शेडमाके यांच्या कन्या सृष्टी शेडमाके तसेच श्रद्धा व अंधश्रद्धा या विषयावर उत्कृष्ट चित्रप्रदर्शनसाठी द्वितीय पुरस्कार प्राप्त शिवानी लामकाने यांचा मान्यवरांचे हस्ते सत्कार केला. संविधानाचे प्रास्ताविक अवनी चव्हाण हिने केले. कार्यक्रमाचे संचालन प्रिती नगराळे यांनी केले.तर आभार विजया श्रीखंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी प्रा. पुष्पा घोडके, वर्षा सहारे, प्रिया गजभिये, देवानंद बडगे, चित्तरंजन चौरे, रामभाऊ डोंगरे, चंद्रशेखर मेश्राम, नरेश महाजन, देवयानी व डॉ. सुनील भगत, मंगला गाणार यांनी प्रयत्न केले.










“ विचारपूर्वक केलेली कृती नेहमी फळ देणारी असते. ”



# ‘वामनदादांचे सांगाती’ उत्कृष्ट मुलाखतसंग्रह

*‘वामनदादांचे सांगाती’ हा संवादक बालाजी वाघमारे यांनी महाकवी वामनदादा कर्डक यांच्या आठवणी व कार्य कर्तृत्वाविषयी विविध विचारवंत, मुलाखतकरांनी घेतलेल्या अठरा मुलाखतींचा संकलित/संपादित केलेला ग्रंथ होय. हा ग्रंथ ‘मुक्त मंथन’ प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला आहे.*

यात डॉ. यशवंत मनोहर, प्रा. रविचंद्र हडसनकर, प्रा. विजयकुमार गवई, प्रमोद वाळके ‘युगंधर’, डॉ. सागर जाधव, डॉ. ऋषिकेश कांबळे, विलासराव जंगले, नारायण जाधव ‘येळगावकर’, डॉ. सा. द. सोनसळे, सुदाम सोनुले, शाहीर डी. आर. इंगळे, संजय रायबोले, डॉ. नारायण कांबळे, सुरेश साबळे, विनोद जोगदंड, ललिता घोडके, गोपीचंद कांबळे ‘विद्यार्थी’ व प्रा. शिवाजी बनसोडे यांचा समावेश आहे.

खरेतर वामनदादा कर्डक म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीसाठी संपूर्ण आयुष्य वाहून घेतलेले असामान्य व्यक्तिमत्व होय. त्यांनी डॉ. बाबासाहेबांचा विचार सातत्याने तळागाळातल्या माणसापर्यंत आपल्या हयातीत पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब म्हणाले होते की, ‘माझ्या दहा भाषणांचे काम एका गीताच्या माध्यमातून होऊ शकते’ त्यानुसार आंबेडकरी जलशाकारांनी समाज मनात डॉ. बाबासाहेबांचा सामाजिक, प्रबोधनवादी विचार रुजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. यात अनेकांचा समावेश आहे. मात्र त्यात सर्वोच्च नाव वामनदादाचेच घ्यावे लागेल. डॉ. बाबासाहेबांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना संवादक बालाजी वाघमारे यांनी आपल्या मनोगतात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पुढच्या चिल्ह्या-पिल्ह्यांची परवा न करता इथल्या कोट्यावधी-दीन, दुबळ्यांच्या अंधारलेल्या काळोख्या आयुष्यात सन्मानाचे, स्वातंत्र्याचे चांदणे शिंपडण्याचे काम अहोरात्र केले; म्हणूनच आज माझ्यासारखी मुले शिक्षण घेऊन नोकरीला लागली.’ डॉ. यशवंत मनोहर यांनी वामनदादा कर्डक यांच्याविषयी दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे की, ‘डॉ. बाबासाहेब समजावून घेताना वामनदादांनी जो टाटा-बिर्लाचा उल्लेख केला, भांडवल शाहीचा शोषणसत्ताक म्हणून उल्लेख केला आहे, तो उल्लेख डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाशी संबंधित आहे. तिथे डॉ. बाबासाहेबांच्या वर्गीय तत्त्वज्ञानाचा संबंध आहे, हे लक्षात ठेवा, असे म्हटले आहे. वामनदादा कर्डक गेल्याचे कळल्यावर ‘तुफानातला दिवा विझला अन् वादळ शमला...!’, अशी प्रतिक्रिया रविचंद्र हडसनकर यांनी व्यक्त केली. वामनदादा यांनी ते आंबेडकरवादी असल्याचे अनेकदा निक्षून सांगितले आहे, त्यामुळे त्यांना मार्क्सवादाकडे झुकले आहे, असे म्हणणे गैर आहे, असे प्रमोद वाळके ‘युगंधर’ यांनी म्हटले आहे. डॉ. सागर जाधव यांनी म्हटले आहे की, ‘महाकवी वामनदादांना समाजाने जेवढे प्रेम दिले आहे तेवढे प्रेम कुणालाही दिलेले नाही.

**समीक्षा**



दिनेश कोटांगले
मो.9834492541

तर विलासराव जंगले यांनी म्हटले आहे की, ‘वामनदादांची साधी राहणी, कुठलाही बडेजाव नाही, अहंकार नाही, कुठल्याही जिवलग शिष्याच्या घरी स्वतःच्या घरासारखा मुक्त संचार असायचा.’ वामनदादांच्या गीताविषयी डॉ. सा. द. सोनसडे म्हणतात, ‘आपल्या चळवळीत समाजातील प्रत्येक व्यक्तीचे आश्वासक, आंबेडकरवादी सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व केंद्र म्हणून माणसे ‘वामनदादां’कडे पाहत होते. शाहीर डी. आर. इंगळे म्हणतात, ‘आंबेडकरी गीतकार म्हणून वामनदादा प्रसिद्ध आहेत. समाजाचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत, अशी कबुली प्रांजळपणे वामनदादा देतात.’ देशातील अनेक ज्वलंत प्रश्नांवर वामनदादांनी गीते लिहिली, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील निष्ठा ढळू दिली नाही. संजय रायबोले म्हणतात, ‘महाकवी वामनदादा कर्डक यांनी असंख्य गीते लिहिली आहेत. ती सर्वच गाणी असो अथवा गझला सगळीच तोलामोलाची आहेत.’ डॉ. नारायण कांबळे म्हणतात, ‘आंबेडकरी चळवळीत प्रबोधन आणि लोकजागृतीचे महान कार्य वामनदादांच्या गीतांनी शायरी आणि कवितेने पार पाडले आहे. वामनदादांच्या गीत काव्याने पुढील अनेकांना कवित्वाची देणगी मिळाली, त्यातून बुद्ध- भीम गीतकार कवी, गायकांची मोठी परंपरा निर्माण झाली. आंबेडकरी लोकगीतांनी साठोत्तरी दलित कवितेच्या उद्यापर्यंतचा कालखंड आपल्या अभिवृत्तीने गाजविला. उत्तम असा हा आविष्कार आहे.’ वामनदादा कर्डक यांच्या कार्यास समाजाने न्याय, सन्मान दिला, असे आपणास वाटते काय? या प्रश्नाचे उत्तर बुलढाणा येथील सुरेश साबळे यांनी दिले आहे, ते म्हणतात की, वामनदादा कर्डक यांच्या गीतांवर, गायनावर समाजाने भरभरून प्रेम केले. मानसन्मान सामाजिक पातळीवर वामनदादांना खूप मोठ्या प्रमाणात मिळाला. परंतु त्याचवेळी एक बाब प्रकर्षाने नोंदवाविशी वाटते अशी की, मराठी साहित्य क्षेत्रात आणि महाराष्ट्र कर्डकांचा एक गीतकार म्हणून तसेच त्यांच्या लेखनकार्याची योग्य प्रकारे शासकीय पातळीवर म्हणावी तशी दखल घेतलेली नाही. वामनदादा कर्डक यांच्या गीत रचनेपैकी आपल्याला कोणकोणती गीते आवडतात? असा प्रश्न विचारल्यावर, वेणू जोगदंड यांनी म्हटले आहे की,
‘भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते,
तलवारीच्या तयांच्या न्याऱ्येचे टोक असते.’
‘मला चिड येत नाही हाच माझा गुन्हा दोष देऊ कुणा, सांगा दोष देऊ कुणा?’ वामनदादांच्या गीताविषयी ललिता घोडके म्हणतात, ‘वामनदादांनी फार मोठा इतिहास निर्माण केला आहे. त्यांनी इतकी गीते निर्माण केली आहेत की, ते जवळपास दहा हजार असतील. ज्या काळात शिक्षणाचा अभाव होता. प्रसारमाध्यम नव्हती, त्या काळात आपल्या समाजाची परिस्थिती तेवढी व्यवस्थित नव्हती. तरीही काकांनी लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. काकांचे एक जरी गीत कानावर पडले तर ते गीत लागलीच लोकांमध्ये जायचे आणि ते गीत लोकप्रिय व्हायचे. काकांनी एक गीत लिहिले होते शाळेच्या संदर्भात. ‘शाळेत घाला मूल’ हे गीत खेड्यातील लोकांनी ऐकले आणि या गीतातून प्रेरणा घेतली. यवतमाळ येथील गोपीचंद कांबळे ‘विद्यार्थी’ म्हणतात की, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झंझावाती विचारांची खाण असलेले वामनदादा आहे’. महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा चालता बोलता इतिहास होता. ते आंबेडकरी विचारांचे एक संदर्भ ग्रंथ होते.





महाकवी वामनदादा आयुष्यभर गीते लिहीत राहिले, ते वाहत्या नदीप्रमाणे चालतच राहिले. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे गीत घेऊन वामनदादा विचारांचे ज्ञान देऊन तथागतांच्या धम्माची सेवा करूनच लोकप्रबोधन करीत होते. सोलापूर येथील प्रा. शिवाजी बनसोडे म्हणतात, ‘वामनदादांची काही गाणी गझल प्रकारात आहेत. पण गझलेपेक्षा त्यांची लोकगीते मनावर अधिराज्य करतात व समाज मनाला जाऊन भेटतात. वामनदादांनी गझल, लेखन केल्याचे संदर्भ दिसत नसले तरी गझल लेखनाकडे दादांचा रोख होता. प्रस्तुत मुलाखत संग्रहाला प्रा. विजयकुमार गवई यांनी प्रस्तावना दिलेली असून महाकवी वामनदादा कर्डक यांच्या भावविश्वात शिरताना विविध मुलाखतकरांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. प्रत्येकाला वामनदादांच्या साथ, संगतीचे आपले जीवन जाणिवेने जिवंत व्हायचे, आपल्या शैलीने टिपण्याचा प्रयत्न प्रत्येक मुलाखतकार कसोशीने करताना आढळतो, असे मत व्यक्त केले आहे. प्रस्तुत ‘वामनदादांचे सांगाती’ हा मुलाखतसंग्रह उत्तम असून वामनदादा कर्डक यांचे व्यक्तिमत्व समजून घेण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, असा प्रचंड विश्वास वाटतो. त्यामुळे हा मुलाखतसंग्रह प्रत्येकाने आपल्या संग्रही ठेवावा, असाच आहे.

‘वामनदादांचे सांगाती’ (मुलाखत संग्रह)
संवादक - बालाजी वाघमारे, मो.9421450453
प्रकाशक - सुनंदा बोदिले, मो. 9422956909
‘मुक्तमंथन’ प्रकाशन, अमरावती.
मूल्य-200/-, पृष्ठ-124 ■ ■

# सभागृह बांधुन जयंती साजरी करू !

*11 एप्रिल हा राष्ट्रपिता महात्मा जोतिबा फुले यांचा जन्मदिवस तर 14 एप्रिल हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस. डॉ. बाबासाहेबांनी तथागत बुद्ध, संत कबीर आणि राष्ट्रपिता जोतिराव फुले या तीन महापुरूषांना गुरु मानले. म्हणूनच 11 एप्रिल आणि 14 एप्रिल या गुरुशिष्यांच्या जयंतीला विशेष महत्त्व असते.*

या महापुरुषांची जयंती साजरी करण्यासाठी विविध ठिकाणी बैठका सुरू झाल्या आहेत. एकत्रित येऊन विचार करणे काळाची गरज आहे. नागपूर वाडीतील नागरिकांनी घेतलेला निर्णय प्रेरणादायी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या धुमधडाक्यात, भव्यदिव्य प्रमाणात साजरी होत असते. असा सूर बैठकीत होता. तर नव्या पिढीतिल तरुण महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीपासून विविध कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी झटत आहेत. आमच्या लेखक वाचक मित्रांनी वाडी नागपूर येथे एका हॉटेलमध्ये स्नेह भोजनकरिता काही मोजक्या मित्रांना बोलविले होते. रात्री 8.00 वेळ दिली होती. पण मी वाडी परिसरात फेरफटका मारण्यासाठी मी 7.00 गेलो होतो. अमरावती रोड वर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर आहे. मेन रोड टच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि मोठा परिसर आहे. त्या परिसरात जयंती उत्सव संदर्भात बैठक होती. वस्तीतील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. मी त्यात सहभागी झालो. तेथील उपस्थित लोकांसोबत माझा परिचय नव्हता. पण मी त्या बैठकीची चर्चा ऐकत होतो. एक तरुण बोलत होता. तो म्हणाला, ‘डॉ. बाबासाहेब यांचे देशासाठी योगदान आहे. तर देश-विदेशात लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरवर बोलत आहेत, सांगत आहेत. त्यामुळे इतर राजकीय पक्षांनाही डॉ. बाबासाहेबांचे गुणगान गाणे भाग पडत आहे. ज्या ज्या ठिकाणी डॉ. बाबासाहेबांचे पाऊल पडले आहे, ती भूमी त्यांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे. त्यामुळेच त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर शासकीय पातळीवर स्मारके बनविण्यात चालना मिळाली आहे. त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षण न क्षण आणि कण न कण हा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक कार्यासाठीच खर्च झालेला आहे. त्यांची स्मारके भारतातच नव्हे, तर आज जगभर केली जात आहे. अमेरिकेने कोलंबिया विद्यापीठासमोर त्यांचा ‘सिम्बॉल ऑफ नॉलेज’ दाखविणारा पुतळा बनविला आहे. श्रीलंका, जपान, थायलंड इत्यादी देशातही त्यांचे पुतळे उभारले जात आहेत. जग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानला सलाम करित आहे. कारण ते सामान्यातून जन्माला आलेले असामान्य महामानव आहेत. 1954 साली नेपाळ येथील काठमांडू येथे झालेल्या जागतिक बुद्धधम्म परिषदेमध्ये जगाने त्यांना बोधीसत्व पदवी दिली. त्यांनी आपले संपूर्ण जीवनच सर्व भारतासाठी अर्पण केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुपुत्र रमेश, गंगाधर, राजरत्न आणि इंदू ही चार मुले अल्पवयातच औषध-पाण्यावाचून गेले. परंतु त्यांनी त्याचे दुःख कधी उराशी कवटाळले नाही. त्यांना रामजीबाबांनी मार्ग दाखविला, मीरा आत्याने प्रेम दिले आणि रमाईने शिक्षणासाठी बळ दिले. माईसाहेब यांनी शेवटाच्या क्षणी त्यांना साथ दिली. केवळ अस्पृश्य किंवा मागास समाजासाठीच मुंबईला सिद्धार्थ महाविद्यालय काढले नाही, ते सर्वांना खुले केले. औरंगाबादलाही मिलींद महाविद्यालय काढले, अनेक ठिकाणी वसतीगृहे काढली, तर त्यांनी सर्व समाजासाठीच शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी भारताचे संविधान लिहिले. या देशाचा राज्यकारभार त्याप्रमाणे चालत आहे. त्यांनी हे संविधान सर्व भारतीयांसाठीच लिहिले आहे. म्हणूनच प्रास्ताविकेत ‘आम्ही भारतीय लोक’ म्हटले असून ते संविधान आम्ही स्वीकृत करीत आहोत, असे म्हटले आहे. कारण ते खरे भारतीय होते. म्हणूनच ते म्हणाले की, मी प्रथम भारतीय आहे आणि शेवटीही भारतीय आहे. तरीही त्यांच्या देशप्रेमाबद्दल शंका घेतली गेली होती. परंतु आज सर्व नागरिकांना त्यातील फोलपणा लक्षात आला असून त्यांच्याबद्दल प्रेमाची भावना दिसून येत आहे. त्यांनी आपल्याला इशारा दिला की, मी प्रगतीचा गाडा मोठ्या कष्टाने इथपर्यंत आणलेला आहे, तो पुढे नेता आला नाही, तर मागे तरी ओढू नका. जिथे आहे तेथेच ठेवा. आज डॉ. बाबासाहेबांनी आणलेल्या प्रगतीच्या गाड्याची अवस्था ही न सांगितलेली बरी, अशी परिस्थिती आहे. महापुरूष एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीत जन्माला येतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत प्रवाहाच्या विरूद्ध जातात. आपले अंगीकृत कार्य संपले की, या जगाचा निरोप घेतात. डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला माणूस बनविले. आपल्यातील स्वाभिमान जागृत केला. म्हणून आपण जयंती साजरी करताना पैशाची उधळपट्टी करू नये. या पार्श्वभूमीवर आम्ही येथे मेन रोडवर इतक्या मोठ्या जागी सभागृह बांधले पाहिजे. आपली मोठी इमारत तयार होईल. ज्याप्रमाणे बजाज नगरात करुणा भवन आहे, वर्धा रोड ऊरवेला कॉलोनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह आहे. कोतवाल नगर येथील ऊरवेला सभागृह, उत्तर नागपूर लष्करीबाग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन हॉल, बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे सभागृह टेका नाका, कर्मवीर बाबू हरिदास आवळे सभागृह अंगुलीमाल नगर, काटोल रोड वर स्वतंत्र कर्मचारी संघटनेचे सभागृह आहे. आपण वरीलप्रमाणे आदर्श घेतला पाहिजे आणि ट्रस्ट तयार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सभागृह बांधले पाहिजे हीच खरी जयंती आहे. उपस्थित लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. उपस्थित मान्यवरांनी आम्ही धम्मदान देतो. दादा कामाला सुरुवात करा असा पाठिंबा दिला. हा नवा विचार खूप काही सांगून जातो. मी उपस्थित लोकांचे निरीक्षण करित होतो. उपस्थित लोक आपसात चर्चा करित होते. सभागृह झालेच पाहिजे हाच एक मुखी सूर होता. इतक्यात मित्राचा फोन आला आणि मी हॉटेल मधे आलो. मी मित्रासाठी पुस्तके भेट देण्यासाठी आणले होते. पण तिथे मीटिंगमधे उपस्थित असलेल्या सर्व तरुण मित्रांना पुस्तके वाटून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती बैठकीची चर्चा स्नेहभोजन करतांना मित्रांना सांगितली आहे. सर्व मित्रांनी जयंती साजरी करतांना सभागृह बांधण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. ■ ■







विलास गजभिये
मो. 9421588901

# प्रतिकूल परिस्थितीतून घडलेला कलावंत

सोळा सतरा वर्षापूर्वीची घटना असावी. चिपळूण जवळील एका गावात प्रख्यात गायिका मैनाताई माणिक कोकाटे आणि गायक संगम कासारे यांचा कव्वालीचा कार्यक्रम पाहण्यासाठी गेलो होतो. कार्यक्रम सुरू करण्यासाठी प्रथम संगम कासारे आणि पार्टी यांना निमंत्रित केले. स्टेजकडे जाता जाता गायक संगम कासारे माझ्याजवळ येऊन मला ‘मामा’ अशी आपुलकीने हाक मारून जय भीम आणि सन्मानपूर्वक नमस्कार केला. मामा मी प्रविण मोहितेचा मित्र संगम कासारे. मैनाताई यांनी गायलेल्या तुमच्या गाण्यांच्या कॅसेट, व्हि. सी. डी त तुमच्या गाण्यांना हार्मोनियम साथ आणि कोरस दिलाय सांगितले. आज काही चुकले तर समजून घ्या, सहकार्य करा.

मी ही छान होऊ द्या कार्यक्रम, माझ्या शुभेच्छा आहेत म्हणालो. माझी मोठी अडचण झाली. दोन्हीही कलावंतांनी मला सन्मानपूर्वक स्टेजवर बोलावले, गंमत म्हणजे त्यादिवशी प्रथम टर्न होईपर्यंत दोन पार्टीच्या मध्ये बसून. नंतर खाली उतरून स्टेज समोर न बसता एका बाजूला बसून कार्यक्रमाचा आस्वाद नी आनंद घेतला. अतिशय रंगतदार असा कार्यक्रम झाला. त्यानंतर चिपळूण, गुहागरमध्ये जिथे संगम कासारे यांचे कार्यक्रम असतील तिथे त्यांनी मला बोलावले, मी हजर राहिलो. भाचा प्रविणचा मित्रपरिवार मला प्रिय आहे. सारेच माझा आदर सन्मान करतात त्यातीलच एक संगम देवजी कासारे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील कोंडे हे संगम यांचे जन्मगाव. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगलेल्या या कलावंताविषयी मला आदर नी आपुलकी आहे. परिस्थितीशी झगडा देत, आईच्या कष्टाला साथ देत, बंधूंच्या आधाराने चौथीपर्यंत मूळगावी, पाचवी ते सातवी करंजाळी प्राथमिक शाळेत, पुढे एकीकडे शिक्षण, मोलमजुरी, गुरे राखत आईला शेती कामात मदत करत, बंधू काशीनाथ यांच्या साथीने दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. कधी कधी निसर्ग, काळ आपली परीक्षा घेत असतो. संगम एक वर्षाचे असताना वडिलांचे निधन झाले. घरात कर्ता मोठा भाऊ राहुल नी काशीनाथ पण संगम तेरा वर्षाचा असताना आकस्मिकपणे मोठ्या भावाचे राहुल यांचे निधन झाले. पती नंतर मोठ्या मुलाचे निधन आईला हा मोठा धक्का, आघात होता. बहिणी शेवंता सीता, मीना दिल्या घरच्या. आईने जिद्द सोडली नाही, शेजारच्या संगलट गावात चालत जाऊन लोकांची शेतमजुरी, कधी धुणीभांडी करून कुटुंबाला आधार दिला.



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356

संगमने दहावीनंतर परिस्थितीमुळे पुढील शिक्षणे सोडून गावात पिठाच्या गिरणीत काम स्वीकारले. वयाच्या तेविसाव्या वर्षी आंतर जातीय विवाह केला. पत्नी सुप्रिताची आज मीतीस चांगली साथ लाभली आहे. त्या धार्मिक कार्यात सक्रिय असून भारतीय बौद्ध महासभेच्या नवी मुंबईत केंद्रीय शिक्षिका प्रवचनकार आहेत. सधन कुटुंबातील मुलगी गरिबा घरी आली. भविष्याचा विचार करून मोठा पुतण्या मनोज कासारेकडे मुंबईत बांद्रा येथे नोकरी करिता आले. मुंबईत एका हॉस्पिटल मध्ये नोकरी केली. मात्र दहा वर्ष नोकरी करून ते हॉस्पिटल बंद पडले. पण हिंमत न हरता. मिळेल ते काम करत आपल्या कुटुंबांचा मुलांचा संभाळ करून कुटुंब स्थिरस्थावर केले आहे. एवढ्या सगळ्या अडीअडचणी येऊन सुद्धा हा कलाकार हिंमत न हरता मार्गक्रमण करत आहे आणि आज मराठी, हिंदी, उर्दू कव्वाली गायनात कोकण, विदर्भ, महाराष्ट्रात आणि राज्याबाहेर कार्यक्रम करत आहे. ते स्वतः उत्तम शीघ्रकवी आहेत. कुठलही गीत लिहिले की गेली दहा बारा वर्ष ते आवर्जून मला पाठवत असतात. मामा काय चुकले का बघा. त्यांच्यातील ही विनम्रता खूप भावते. त्यांच्या गायन, काव्य लेखन कले बाबत थोडी माहिती. सहा भावंडात संगम लहान. आई अनुसयाने आपल्या मुलांना परिस्थितीची जाणीव करून दिली. तिने आपल्या मुलाना सामाजिक, धार्मिक, कला कार्यात सक्रिय होण्यास प्रोत्साहन दिले. वाडीत सार्वजनिक कार्यक्रमात वयाच्या तेराव्या वर्षापासून संगम गायन करू लागला. इतर भाऊबंद त्याला साथ देत आणि वाडीतील सर्व जुनीजानती मंडळी आई कौतुक करत असे.

वाडीतील प्रसिद्ध कवी चंद्रकात कासारे यांच्या गीत गायन कार्यक्रमाचा प्रभाव संगम यांच्यावर पडला. प्रथम ते त्यांचीच गीते गात असते. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी प्रथम जुगलबंदी कार्यक्रम पुरुषपार्टी सोबत भोपनचे महेंद्र मोरे यांच्या सोबत केला. बंधू चंद्रकात कासारे यांची गीते होतीच. पण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मशताब्दी गीत स्वतः लिहून सादर केले. प्रेक्षकांनी दाद दिलीच. पण प्रतिस्पर्धी गायक मोरे यांनीही जाहिर कौतुक केले.

## संगम कासारे





प्रख्यात कवी गायक अरविंद रूके यांनी उत्तम मार्गदर्शन साथ दिल्याचे ते आवर्जून सांगतात. कवीगायक संदीप यादव यांनी बेंजो कसा लावायचा, त्यावर कस गायचे, ताल दूर, राग त्यांनीही रुकेदादासारखे समजावून सांगितले आणि एका गायन स्पर्धेत संगम यांचे गीत गाऊन प्रथम क्रमांक मिळविला आणि तिथेपासून लेखन उत्साह वाढला. तबला वादक प्रकाश कासारे यांचा सहवास त्यांच्यामुळे मराठी, हिंदी, उर्दू कव्वाल यांना कोरस देण्यासाठी जाऊ लागलो. छोटे जानी बाबू, अबू साबा, अल्ताफ राजा, अजीज नाझा, हबीब साबरी, मराठीत लता किरण, सुषमा देवी, मिनाक्षी थोरात, चंद्रमणी घाडगे, बी. टी. कदम, निशा भगत, अजय घाडगे, जनार्दन धोत्रे, प्रभाकर पोखरिकर आणि प्रख्यात गायक आनंद शिंदे अशा दिग्गज यांना कोरस दिला. या सर्वांनी प्रोत्साहन दिले. संगमाने या सर्वांच गायन पाहिले, ऐकले, निरीक्षण केले. आनंद शिंदे, अरविंद रुके यांना आपले गुरु मानले आहे. पहिला सामना स्त्री कलावंतसोबत तो ही प्रख्यात जुनी गायिका शीलादेवी यांच्यासोबत गायला, त्यांनीही बेटा तू गात रहा अशा शुभेच्छा देऊन प्रोत्साहन दिले. बी. टी. कदम यांनीही आपणास योग्य मार्गदर्शन केल्याचे ते सांगतात. गायिका मैनाताई माणिक कोकाटे या उभयतांनी अनेक कार्यक्रम दिले.

त्याचं बरोबर प्रख्यात गायिका चंद्रकला गायकवाड, मिनाक्षी थोरात, दिपाली शिंदे, असटशीला बनसोडे शालिनी शिंदे, सुहासिनी शिंदे, कविता विद्यागर या गायिकांनीही कार्यक्रम प्रोत्साहन दिले. आजवर चारशेपेक्षा जास्त मुकाबले गायले आहेत. कवी एकनाथ माळी, चंद्रकांत निरभवणे, प्रकाश पवार, रमेश येलवे, संघप्रिय कदम, शांती जाधव आणि ज्ञानेश पुणेकर यांनी गीतांची त्यांना साथ दिली आहे. हल्ली ते माझीही गीते गात असतात. ‘बुद्ध विश्वाला मार्गदाता आहे’ या सारख्या अनेक कॅसेट सीडी त त्यांनी गायन केले आहे. त्यांना अनेक मान सन्मान पुरस्कार मिळाले आहेत. दिल्लीतील जगजीवन दास या संस्थेने 2012 सालात सन्मान केला आहे. आपल्याला आर्थिक अडचणीत सम्यक कोकण कला मंच, काही दानशूर व्यक्ती राजेश सावंत, मंगेश सरदार अनिल जाधव, दिपक महाडीक, सुधीर, संजय पवार, संघराज तांबे यांनी आणि इतरानी मदत केल्याचे सांगतात. दोन वर्षापूर्वी मला म्हणाले मामासाहेब माझी गीत पुस्तके रूपाने प्रकाशित करायची आहेत. तुम्ही प्रस्तावना, शुभेच्छा लिहा. मी शुभेच्छा लिहून त्यांची इच्छा पूर्ण केली. अनेकांनी आर्थिक सहकार्य केले वयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात या कवीने स्वतःची ‘संगम काव्यधारा पुस्तक रूपाने प्रकाशित केली आहे. त्यासाठी कवी मंदार कवाडे, सिद्धार्थ साळवी, संतोष गमरे, अमन आढाव मित्र परिवार याचे मार्गदर्शन मिळाले. अतिशय नम्र, शांत, संयमी, पण प्रभावी गायन करणारे संगमजिना सामाजिक चळवळीच भान आहे. त्यांच्या श्रीजीत, हार्दिक मुलांनीही शास्त्रीय संगीतचा अभ्यास केला असून ते ही उत्तम गातात. त्यांचा चिरंजीव हार्दिक उत्तम हार्मोनियम वाजवतो, कोरस करतो आणि उत्तम गातोही. संगम लोकगीत, प्रचार नी प्रासंगिक गीते सुंदर लिहितात. त्यांची संगम काव्यधारा रसिकांनी वाचायला हवी.

‘वर्षानुवर्ष जगलो व्यर्थ
कळला नव्हता आम्हास अर्थ
तुझ्यामुळे झाले जीवन सार्थ
भीमा तूच दिलास आकार
थोर तुझे उपकार’

अशी अनेक गीत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले, शाहू महाराज, भीमाई, रमाई, सावित्रीमाई, यशोधरा, शिवाजी महाराज यांची जीवन गाथा सांगणारी अभ्यासपूर्ण गीते लिहिणाऱ्या या कवी गायकाने अजून नावलौकिक प्राप्त करावा हीच मंगल कामना. शुभेच्छा! ■ ■

## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

### स्त्री उद्धारिणी

तूच आमुची सरस्वती
अन तूच आमुची तारिणी

तूच आम्हा घडविले
अन तूच आम्हा सजविले
ज्ञानरूपी दागिन्यांनी
तूच आम्हा मढविले

तूच आमच्या जीवनाला
अर्थ दिला अन सार्थ केले
किती तुझे हे उपकार आई
तुझ्या कर्तृत्वाला उपमा नाही

कसे फिटे हे ऋण तुझे
तूच सांग आम्हाआता
देऊनी या प्राण आमचे
न फेडता येईल पांग तुझे

- जयश्री नरेंद्र धात्रक

### मामा अमुचे

समजायला लागले तेव्हापासून,
खेळलो ज्यांच्या अंगा-खांद्यावर
त्यांनाच न्यावे लागले आता,
आम्हाला अमुच्या खांद्यावर
रडलो असता, रूसलो असता,
घेई लहानपणी कडेवर
काम असो ते कुणाचेही,
करण्या असती अग्रेसर
मामा नव्हे ते मित्रच होते,
हक्क होता अमुचा मामावर
मामा आता निघून गेले,
कोरून आठवणी मनावर

- चंद्रकांत सावळकर

### लटकवा फासावर

लटकवा फासावर - लढणे सोडणार नाही..
विश्वास श्वासावर - जगणे सोडणार नाही..
व्यवस्थेने कितीदा दिल्या-हाती बंदुका तरी ?
लेखणीने चिरफाड - करणे सोडणार नाही..
धर्मांधांनी पेटविल्या - कितीदा दंगली तरी ?
आता बंधूभावास - जपणे सोडणार नाही..
मनुवाद्यांनी पेरले - कितीही मनसुबे तरी ?
संविधान उद्देशिका - पाळणे सोडणार नाही..
भोगले पिढ्यांनी कितीदा-गुलामीला तरी ?
त्या मुजोर सत्तेला - गाडणे सोडणार नाही..
कुणी कितीही मारल्या - भुलथापा तरी. ?
त्या मत मुल्यास - जागणे सोडणार नाही..
लटकवा फासावर - लढणे सोडणार नाही..

- दिनकर रा. मडकवाडे

### नको तिला डे स्पेशल

नको तिला डे स्पेशल
नको तिला एक दिवसीय सन्मान
ती स्त्री असण्याआधी एक माणूस आहे
याचे असू द्या फक्त भान .....
लहानपणापासून तू मुलगी आहे
आणि दुसऱ्या घरची होणारी सून आहे
असे तिच्या मनावर कोरल जात
नियमांचे आणि मर्यादेचे
ओझ तिच्यावर लादल जात...
रंग रूपावरून नेहमी तिला तोलण्यात येत...
असे नको राहू एवढी, नको हसू
असे वारंवार तिला टोकण्यात येत...
कधी आई-बाबांच्या शब्दासाठी तर
कधी नवऱ्याच्याच मान सन्मानासाठी
तिच्या स्वप्नांना मारण्यात येत...
वंशवाढीसाठी आणलेली
तू खेळणी अस तिच्याकडे पाहण्यात येत...
संपूर्ण आयुष्य पणाला लावून
सर्वांना ती सांभाळून घेते
आणि मग हळूहळू
तिचेच अस्तित्व संपण्यात येते...
म्हणूनच म्हणते
नको तिला डे स्पेशल
नको तिला एक दिवसीय सन्मान
ती स्त्री असण्याआधी एक माणूस आहे
याच फक्त असू द्या भान...

- रूपाली महाजन.

### नारी शक्ती!!

जननी विश्वाची पंच तत्वांची, तुच सृष्टी चे अद्भुत मंथन,
नारी शक्तीला स्त्री शक्तीला, त्रिवार करतो मी वंदन !

निसर्गाची तू अनोखी देणं, साऱ्या विश्वाच अनमोल लेणं,
रमा सावित्री जिजा होऊन, चंदनापरी जीवन झिजून,
मुर्ती वात्सल्याची, पूर्ती कर्तव्याची सर्व नात्याची कोमल गुंफून,
नारी शक्तीला स्त्री शक्तीला, त्रिवार करतो मी वंदन..

चुल न् मूल हे जुनाट झाले, डाक्टर इंजिनिअर पायलट झाले,
तू देशाचे ललाट झाले, तुझे विश्वच अफाट झाले,
गगण तुला प्रदान, तुझी उंच उडान, तुझ्या नयनात निळेच अंजन,
नारी शक्ती ला स्त्री शक्ती ला त्रिवार करतो मी वंदन.

महामाया तू बुद्ध जन्माची, तूच करुणा मंगल मनाची,
धैर्यरमा तू संकट क्षणांची, तूच झलकारी रणांगणाची,
नित्य मायेची धार, तुझी महीमा अपार तुझे करावे कितीही वर्णन.
नारी शक्ती ला, स्त्री शक्तीला त्रिवार करतो मी वंदन.

-चित्तरंजन चौरे

### बाबासाहेब आणि जागतिक महिला दिवस

‘अंधार होता’ तुझ्या जगण्यात
बाबांसाहेबानी आणले तुला प्रकाशात
देऊनी ‘समतेचा व मता’ चा अधिकार
‘अस्मिता’ निर्माण केली तुझ्या जीवनात...1...
क्लारा जेटकीन लढली अधिकारासाठी
बाबासाहेब महिलांच्या उभे राहिले पाठी
देऊन शिक्षणाचा अधिकार हाती दिली पाटी
तर ‘जागतिक महिला दिन’
कोणासाठी....2....
तू गुलामाची होती गुलाम
शिक्षण घेऊन झाली तू मोठी
सारे जग करती तुला सलाम
‘मानव’ म्हणून दिली
तुला पदवी मोठी...3...
व्यक्तिमत्व ही तुझे उजाळून निघाले
बाबासाहेबांनी, हिन्दू कोड बिल आणले
आता घे गगन भरारी तू
जगाने ‘महिलेचेही’ मर्म जाणले....4...

- इंजि. शुद्धोधन बडवणे

### घरी गंगा काशी ?

बारा वर्षांनी सजतो
कुंभमेळा सण शुभ
गंगास्नान करी भक्त
पाप धुण्याचाच लोभ
वाटे पवित्र आंघोळ
पुण्य बांधावे पदरी
भोळे जन गंगेकाठी
झोपे ओढून चादरी

मृत्यू झालेत नाहक
प्रयागराजला स्नान
झाला प्रवास अंतीम
गेले निर्दोषांचे प्राण
मौनी अमावस्या दिनी
लोक धावता पडले

नागा पळे जनताही
शव मौनाने रडले
कोणी म्हणे तीस मेले
नसे आकड्यांचा पत्ता
बेवारस किती देह
पैसे कपडे बेपत्ता
जावे अवश्य स्नानास
स्वच्छ ठेवा नदी गंगा

सामान्याची नाही सोय
ओळखावे नेत्या रंगा
तीर्थक्षेत्र आहे घरी
आईबाबा चरणांशी
सेवा करा वार्धक्यात
माय गंगा बाबा काशी...

- डॉ. शील बागडे

# शांतीवन येथे 3 दिवसीय विपश्यना शिबिराला आरंभ



52 प्रशिक्षणार्थी सहभागी

**वाडी :** शांतीवन चिंचोली प्रकल्प फेटरी नजीकच्या डॉ. बाबासाहेब आंतरराष्ट्रीय वस्तुसंग्रहालय शांतीवन बुद्ध विहार परिसरात प्रथमच तीन दिवसीय निवासी विपश्यना शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळवण्याची दिसून आले. सर्वप्रथम सर्व शिबिरार्थीचे रिटायर्ड मेडिकल ऑफिसर डॉ. आनंद गजभिये व परेश कांबळे यांच्या हस्ते मेडिकल चेकअप करण्यात आले, मंगळवारला या निवासी शिबिराचे विधिवत उद्घाटन विपश्यना शिबिराला मार्गदर्शन करणारे भंते वंदनीय खेमापाल भन्ते लॉग जोंग बुद्धिस्ट शिक्षा केंद्र, नाहरकटिया डिब्रुगढ आसाम यांच्या हस्ते व भारतीय बौद्ध परिषद, शांतीवन चिचोलीचे मुख्य व्यवस्थापक संजय पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या तीन दिवसीय शिबिरात नागपूर व बाहेरील भागातून विविध वयोगटातील 52 महिला पुरुष सहभागी झाले आहेत. पहिल्याच दिवशी भंते यांनी तथागत बुद्ध मूर्तीला अभिवादन करून बुद्ध वंदना अष्टशील देऊन व विपश्यनेचे महत्त्व सांगून शिबिराला प्रारंभ केला. तर आयोजक भारतीय बौद्ध परिषद तर्फे संजय पाटील यांनी प्रशिक्षक वंदनीय खेमापाल भंते लॉग जोंग बुद्धिस्ट शिक्षा केंद्र, नाहरकटिया डिब्रुगढ आसाम यांचा परिचय करून दिला. या तीन दिवसीय शिबिरामध्ये तथागत बुद्धाचे तत्त्वज्ञान, ध्यान साधना, बुद्ध धम्माचे दैनंदिन जीवनात महत्त्व व आवशक्ता, दैनिक जीवनात चिंतामुक्त व शांतीने जीवन जगण्याचा मार्ग, परिस्थितीचे समायोजन, श्वासावर नियंत्रण आदि आनंददायी जीवन जगण्याच्या मार्गावर प्रात्यक्षिक सह उद्बोधन ही करण्यात येत आहे. शांतीवन बुद्ध विहार परिसरात हे निवासी शिबिर यशस्वी करण्यासाठी येथील संजय पाटील, प्रदिप लामसोंगे, परेश कांबळे, साधना हाडके, रेखा भांगे, हिरोशिमा रामटेके, राहुल भैसारे, धर्मपाल दुपारे, दीपाली शेंडे, कोमलदास शेंडे, अश्विनी लोखंडे कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# सुदृढ समाज स्वास्थ्यासाठी बुद्धांचा अष्टांगिक मार्ग : प्रा. घनश्याम धाबर्डे



**नागपूर :** जेष्ठ नागरिकांच्या आरोग्य विषयक वेगवेगळ्या समस्या असतात. त्यावर वेळीच उपाय न केल्यास आजाराचे गंभीर परिणाम उद्भवतात. साधारणपणे मनुष्याच्या शारीरिक व्याधी पाचन क्रियेतून निर्माण होतात. वाढत्या वयानुसार बद्धकोष्टतेचा त्रास बळावत असतो. त्यावर उपाय म्हणजे नियमित व्यायाम, फायबर युक्त भोजन आणि डॉक्टरच्या सल्ल्यानुसार वेळोवेळी औषधोपचार करणे होय, असे विचार धम्मसंगोष्टीच्या 333 व्या सभेत प्रमुख अतिथी आणि गॅस्ट्रोतज्ञ डॉ. स्नेहल मकेश्वर यांनी व्यक्त केले. डॉ. मकेश्वर यांनी पॉवर पॉइंटवर पोटापासून निर्माण होणाऱ्या विविध आजारचे प्रकार स्पष्ट करून संगितले. पोटाच्या आजारा संबंधित सभेत विचारलेल्या सर्व प्रश्न, शंकांचे समाधान केले. धंतोलीतील जसलीन बिल्डिंगच्या बाजूस असलेल्या 'डॉ. मकेश्वर गॅस्ट्रो क्युअर क्लीनिक' मध्ये पोटाच्या आजाराची सुक्ष्म आणि तांत्रिक तपासणी केली जाते अशी माहिती श्रीराम बनसोड यांनी आपल्या प्रस्ताविकतेत दिली.

प्रत्येक व्यक्तीचे स्वास्थ्य हे सम्यक विचार, सम्यक वाचा, सम्यक आजीविका, सामाजिक वर्तन व कार्यावर अवलंबून असते. निरोगी स्वास्थ्यासाठी तथागत बुद्धांनी आर्य अष्टांगिक मार्ग सांगितला आहे. माणसाने अष्टांगिक मार्गावर वाटचाल केल्यास व्यक्ती शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्य सुदृढ ठेऊ शकतो. तथागतांच्या तत्वज्ञानातच मानवी जीवनाचे सुख व समृद्धी दडली आहे, असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. घनश्याम धाबर्डे यांनी व्यक्त केले. 19, 20 मार्च 1927 रोजी महाडचा संग्राम घडून आला होता. त्यानिमित्ताने गुरुवार दि. 20 मार्च 2025 रोजी धम्मसंगोष्टीची सभा 'बुद्धिस्ट सेमिनरी, उंटखाना' येथे होणार असल्याचे सभेत जाहीर करण्यात आले. बुद्धगया मुक्ति आंदोलनात प्रत्येकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असेही सभेत आवाहन करण्यात आले. सभेत संध्या बनसोड, नमिता सागर नाईक, तेजराज भागवतकर यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. सभेला कविता अमोल जाधव, शोभा नागदेवे, लतिका इलमकर, सी. एम. मून, वाय. एस. लिंगायत, रोहिणी मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते. रेखा नाईक यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.




अस्मिता बुद्ध विहार, नरेंद्र नगर, नागपूर
अध्यक्ष : देवांगिणी कांबळे 9766916610
सचिव: विरेंद्र अंबुलकर 9823094546
विहारात मुलांसाठी कराटे शिबीर उन्हाळी शिबीर, विविध स्पर्धा आयोजित केली जाते. नरेंद्र नगर येथील संविधान दिवस कार्यक्रमांचे 2017 पासुन कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याची तयारी 3 महिन्यापासून दर शनिवारी दुपारी 4 वाजता सभा या विहारात होतात.
संवाद मित्र, श्रीराम बनसोड, 918208617748

# बौद्धांनी व्यापारात उतरावे : चांगदेव शेंडे



**नागपूर :** स्थानिक सम्यक बुद्ध विहार खामला येथे बौद्ध समाजाचे सक्षमीकरण समस्या व उपाय या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रम सुरु करण्यात आला. परिचय समितीचे सचिव ए. के. पाटील यांनी केला. चांगदेव शेंडे यांनी बौद्धांच्या समस्यावर बोलताना म्हणाले, आपल्या देशात 144 कोटी लोक राहतात. त्यापैकी 30 कोटी लोकांना रोजगार मिळाला असेल सरकारच्या नितीनुसार आता नोकऱ्या लागणे बंद झालेले आहे. संपूर्ण माहिती घेण्यासाठी हा 90 दिवसाचा कोर्स आहे. हा कोर्स केला तर काही तरुण या कामाला लागतील, तर समाज समृद्ध होईल आणि आपण आपल्या समस्या सोडवू शकू. हे पूर्णपणे समजण्यासाठी 5 तासाचे कॅडर कॅम्प करणे गरजेचे आहे. दोन तासाच्या परिसंवादात फक्त थोडक्यात माहिती दिली आहे. त्यांचे परिसंवाद सिकंदराबाद, भोपाळ, भंडारा, गोंदिया, औरंगाबाद, गडचिरोली, नांदेड, येथे झालेले आहेत. सध्या बजरंगनगर येथे दर सोमवारी सुरु आहेत. ज्यांना या शिबिराचा लाभ घ्यायचा असेल त्यांनी बजरंग नगर येथील विहारात 3 महिन्यापासून संध्याकाळी 6 वाजता सुरु असलेल्या शिबिराचा लाभ घ्यावा असे ते म्हणाले.

या नंतर प्रा. धाबर्डे यांनी काही प्रश्न शेंडे यांना विचारले. त्याचे त्यांनी समर्पक उत्तरे दिली. त्याचप्रमाणे चिंचखेडे यांनी सुद्धा प्रश्न विचारले. कार्यक्रमाचे संचालन ए. के. पाटील, तर आभार प्रदर्शन सिद्धार्थ खोब्रागडे यांनी केले.

## महत्वाचे

### भंते विमलकिर्ती गुणसिरी यांची धम्माधिष्ठित राजकारणावर आज धम्मदेशना



**नागपूर :** धम्म समता, स्वातंत्र्य व बंधुत्वाची शिकवण देते. संविधान या सामाजिक जीवनमुल्यांवर अधिष्ठित आहे. म्हणून धम्म शासनाच्या साधनापेक्षा वेगळे नाही. यासाठी डॉ. बाबासाहेबांनी राजकीय लोकशाहीचे रूपांतर शक्य तितक्या लवकर सामाजिक लोकशाहीत होण्याचा आग्रह धरला होता. त्याशिवाय लोककल्याणकारी राज्याची संकल्पना पूर्णत्वास येणार नव्हती. आज तशीच स्थिती निर्माण झाल्याने देश अराजकता व हुकूमशाहीच्या वळणावर येऊन ठेपला आहे. हा धोका संपविण्यासाठी धम्माधिष्ठित राजकारण याचीच आज खरी गरज आहे. हे धम्माधिष्ठित राजकारण व्यवहारात उतरविण्यासाठी भंते विमलकिर्ती गुणसिरी यांची 16 मार्च रोजी बानाई सभागृहात दुपारी 2.30 वाजता धम्मदेशना आयोजित केली गेली आहे. या कार्यक्रमाला आंबेडकरी समुहाने मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन मिलिंद पखाले, सुनील सारीपुत्त, नानाजी गायकवाड, एस. के. गजभिये, छाया खोब्रागडे, प्रकाश दार्शनिक, जयंत इंगळे, रंजना वासे, ज्योती आवळे, अस्मिता लोखंडे, विशाल वानखेडे, सुबोध जंगम यांनी केले आहे.

### महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बसपाची राज्यभर निवेदने



**नागपूर :** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार संबंधातील बौद्धगया टेम्पल अ‍ॅक्ट 1949 रद्द करून महाबोधी महाविहाराचे प्रबंधन बौद्धांच्या स्वाधीन करावे या प्रमुख मागणीसाठी बहुजन समाज पार्टी चे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी राजारामजी व प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. सुनील डोंगरे यांच्या आवाहनानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारींच्या माध्यमातून राष्ट्रपतींना व बिहार राज्य सरकारला निवेदने पाठविण्यात आली. नागपूरचे निवेदन जिल्हाधिकारी विपिन इटणकर यांच्या माध्यमातून पाठविण्यात आले. नागपुरातील निवेदन जिल्हाधिकारी बिपिन ईटणकर यांना महाराष्ट्र प्रदेश बसपाचे महासचिव पृथ्वीराज शेंडे, नागोराव जयकर, उत्तम शेवडे, जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार, महासचिव चंद्रशेखर कांबळे, प्रभारी रंजना ढोरे, राजकुमार बोरकर, सुनंदा नितनवरे यांच्या नेतृत्वात देण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने अभिलेश वाहाने, नितेश कांबळे, उमेश मेश्राम, ताराबाई गौरखेडे, नितीन वंजारी, सावलदास गजभिये, तपेश पाटील, आशिष आवळे, भानुदास ढोरे, सुबोध साखरे, आदि प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

### रामधुन काढुन स्वच्छतेचा संदेश देऊन होळी साजरी



**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी होळीच्या निमित्याने समाजातील वाढती विकृती विचित्रपणा पाहुन धुळवडच्या दिवशी गांवा गांवा मधे स्वच्छता करुन आदर्श मानवी नितीमुल्य रुजावी, अभिसरण व्हावे म्हणुन स्वच्छ पोषाख परिधान करुन स्वच्छतेचा संदेश देत रामधुन काढावी असा संदेश दिला.

श्रीगुरुदेव सेवामंडळ नागपूरच्या वतिने गणेश पेठ, रामाजी वाडी, बसस्थानक या भागामधुन संदेश देत रामधुन काढण्यात आली. रामधुनचा समारोप नागपूर आश्रमला करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाला प्रसिद्ध विचारवंत जावेद पाशा उपस्थित राहुन होळी कार्यक्रमाचे महत्व सांगितले. प्रा. सुरेंद्र बुराडे यांनी होळीचे ऐतिहासीक महत्व सांगितले. गणेशपेठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मच्छींद्र पंडीत यांनी शुभेच्छा दिल्या. अज्ञानाची होळी करुन विज्ञानाचा स्विकार करावा असे संस्थेचे अध्यक्ष अशोक यावले यांनी मत व्यक्त केले. राजेश कुंभलकर यांनी संचालन तर सुरकार यांनी आभार व्यक्त केले. सचिव विठ्ठलराव पुनसे, सियाराम चावके, संगिता जावळे, मुरलीधर नरड, आनंद माथने, सतिश देशमुख यांनी संदेश पर भजने गायली. रामधुन मधेअसंख्य गुरुदेव प्रेमींनी सहभाग घेतला.

# भारतीय बौद्ध महासभेचा बी.टी. एक्ट रद्द करण्याकरीता मोर्चा



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडी तसेच नागपूर येथील विविध धार्मिक, सामाजिक, संघटना, भिक्खु, भिक्खुनी, संघ समता सैनिक दल येथील महाबोधी महाविहार बुद्धगया बिहार सरकारच्या बी टी एक्ट 1949 मधुन मुक्त करुन संपूर्ण बौद्धांच्या व भिक्खु संघाचे स्वाधीन करण्याचे मागणीसाठी जिल्हाधिकारी नागपूर यांचेमार्फत मुख्यमंत्री बिहार सरकार यांचा निषेध नोंदविण्यासाठी, संविधान चौक नागपूर येथे संपुर्ण संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी एकत्र येऊन त्रिशरण पंचशील घेऊन धरणा आंदोलन करण्यात आले. संविधान चौक येथुन जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालयकडे मोर्चा काढण्यात आला. यावेळी बिहार सरकार विरोधात नारे लाऊन निषेध नोंदविण्यात आला. मोर्चा उपआयुक्त पोलिस परिवहन कार्यालयाजवळ रोखण्यात आला. भारतीय बौद्ध महासभेचे विलास उंदीरवाडे, अध्यक्ष, पश्चिम शाखा जे. आर. गोडबोले, अध्यक्ष महानगर जिल्हा शाखा महिला विंग अध्यक्ष पपीता खोब्रागडे, शितल वाघमारे, सरचिटणीस आनंद सायरे, उपाध्यक्ष भगवान कांबळे जिल्हा कोषाध्यक्ष, महानगर नागपूर, फुसाटे, रवि शेंडे, शहर अध्यक्ष वंचित बहुजन आघाडी, अरुण गाडे, अध्यक्ष महासंघ कास्ट्राईब, मो.91 99709 01376 रामटेके बानाई आणि मोर्चाचे प्रमुख नेतृत्व केले, असे इंजि. पद्माकर गणवीर राष्ट्रीय संघटक, भारतीय बौद्ध महासभा तसेच भिक्खु भिक्खुनी संघ, उपासक उपासिका संघ वर्षा धारगावे महिला विंग अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, कांता शेंडे, रमा गोडबोले, सरोज खोब्रागडे, पंचशीला सहारे, गीता जांभूळकर, रमा सोमकुवर, सुधा मेश्राम, बी. के. हिवराळे, गंगाधर कांबळे, डॉ. तक्षील वासनिक, नलीनी खांडेकर, इत्यादींनी नितिश कुमार मुख्यमंत्री, बिहार सरकार यांचे नावे आणि प्रत राष्ट्रपती, भारत सरकार व प्रधानमंत्री भारत सरकारचे जिल्हाधिकारी नागपूर यांना निवेदन देण्यात आली. या नंतर ज्या ठिकाणी मोर्चा थांबला होता तिथे अंजली आंबेडकर, वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या यांनी मोर्चाला संबोधित केले, त्या नंतर मोर्चा समाप्त करण्यात आला. या मोर्चासाठी सामाजिक, धार्मिक, राजकीय, संघटनांनी सहभाग दर्शविला व सहकार्य केले. त्या सर्वांचे भारतीय बौद्ध महासभा शाखेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# विवाह संस्थेने महिलांना गुलाम केले : अशोक सरस्वती



**तुळजाभवानी नगर :** मानव जेव्हा रानटी अवस्थेत होता तेव्हा टोळी करून राहत होता. टोळीचा प्रमुख स्त्री होती. स्त्रीनेच शेतीचा शोध लावला. समाज मातृसत्ताक होता. परंतु, नंतर विवाह संस्था निर्माण झाली आणि तिने स्त्रियांना गुलाम केले. असे प्रतिपादन बुद्ध विहार समन्वय समितीचे संस्थापक अध्यक्ष अशोक सरस्वती बौद्ध यांनी केले. त्रिरत्न बुद्ध विहार, तुळजाभवानी नगर, वांगी रोड येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने नगरवासियांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रथम भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भंते धम्मपाल यानी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने नगरातील महिला मंडळाचे अशोक सरस्वती यांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. नंतर घनशाम साळवे, एन. जी. खंदारे, बाबासाहेब धाबले, उत्तम रणवीर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवभगत यांनी केले, तर अतुल वैराट यांनी संचालन केले. साळवे यांच्या अध्यक्षीय समारोपाने कार्यक्रम संपला. नायबराव पगारे, आशिष वैराट यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

# बौद्ध संस्कृतीच्या समृद्धीसाठी आंबेडकरी कविता हे साधन : अरविंद सुरवाडे




**अमरावती :** आत्मशोध घेऊन आत्मोद्धार करण्यासाठी या कवितेने उघड उघड बुद्ध विचार स्वीकारून बौद्ध संस्कृती विकसित करण्यासाठी आंबेडकरी कविता लिहिली जाऊ लागली. त्यामुळे बौद्ध संस्कृतीच्या समृद्धीसाठी आंबेडकरी कविता हे महत्त्वाचे साधन असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अरविंद सुरवाडे यांनी केले. ते अमरावती येथे आयोजित आंबेडकरी काव्यसंगीतीतील परिचर्चेत अध्यक्ष म्हणून बोलत होते.

अरविंद सुरवाडे म्हणाले, आंबेडकरी कवींनी जातक कथा, धम्मपद यासारख्या बौद्ध वाङ्मयात अंतर्भूत असलेली काव्य लक्षणे, काव्यालंकार, रूपके, उपमा, प्रतिमा, दृष्टांत, कौशिकी किंवा सौंदर्यवेध, विदग्धता, लोकधर्मिता, नाट्यधर्मिता इ. वाङ्मयीन संकल्पनांचा अभ्यास करावा. 'आंबेडकरी प्रमाणशास्त्र आणि आंबेडकरी कविता - एक शोध' या विषयावरील चर्चेत सहभाग नोंदवताना चर्चक डॉ. प्रकाश राठोड म्हणाले, आपण लिहितो तो शब्द आपल्याला जगता आला पाहिजे. आपण अनेक वर्षांपासून लिहीत आहोत, बोलत आहोत. पण माणसे पेटत नाही. कारण आपल्या लिहिण्यात आणि जगण्यात आंतर्विरोध आहे. अशी आंतर्विरोधग्रस्त कविता आंबेडकरी प्रमाणशास्त्राची कविता ठरत नाही. आपली कविता प्रश्नांच्या काळजाशी भिडली पाहिजे. प्रश्नांच्या उगमस्थानाला या कवितेने हात घातला पाहिजे. जातीयता आणि धर्मांधतेची दुर्गंधी ज्या क्षितिजातून येत आहे ते क्षितिज या कवितेने नाकारले पाहिजे. ही नकाराची ताकद आपल्याला डॉ. बाबासाहेबांनी दिली आहे. आंबेडकरी प्रमाणशास्त्राची कविता गहन आशयाची कविता असते. संविधान, स्वातंत्र्य आणि देश अडचणीत असताना आंबेडकरी कवितेची जबाबदारी वाढली आहे. शोषणसत्ताकाचा सापळा आणि आंबेडकरी कविता या विषयावर अ‍ॅड. आनंद गायकवाड, भारतीय संविधान मूल्ये आणि आंबेडकरी कविता या विषयावर डॉ. गजानन बनसोड, आंबेडकरी कविता - आशय आणि अभिव्यक्ती या विषयावर प्रा. प्रदीप लोहकरे यांनी चर्चक म्हणून सहभाग नोंदविला. परिचर्चेचे संचलन प्रा. संजय घरडे यांनी तर आभारप्रदर्शन राजेश गरूड यांनी केले.

# विविध संघटनांतर्फे महिला दिन साजरा!

## टेकऑफ लेडीज क्लब



**नागपूर :** टेकऑफ लेडीज क्लब उमरेड रोडच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रियतमा दास, उद्घाटक रुबीना पटेल, मार्गदर्शक प्रा. माधुरी गायधनी दुपटे, प्रमुख अतिथी प्रिया घोडमारे, पुष्पा गायधनी नीता ढवळे, कांचन डफरे हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटक रुबीना पटेल यांनी आजही स्त्रियांची मानसिक प्रगती झाली नाही हे विचार मांडले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. माधुरी गायधनी यांनी संविधानातील महिलांच्या अधिकार व हक्काबाबत आजही महिला जागरूक नाही ही खंत व्यक्त केली. सांस्कृतिक कार्यक्रमात गीत -गायन, नृत्य (एकल व समूह) महत्त्वाचा आकर्षण म्हणजे टेक ऑफ क्वीन 2025 स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत द्वितीय पद्मा, लांजेवार तृतीय किर्ती चामलाटे, टेकऑफ क्वीन 2025 ची विजेती पूजा नंदागवळी ही ठरली. उद्घाटकीय कार्यक्रमाचे संचालन ज्योत्स्ना बनसोड व आरती मसराम, प्रास्ताविक प्रीती तिरपुडे, आभार सविता बोकाडे यांनी केले. सांस्कृतिक कायक्रमाचे संचालन सारिका हुसेन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुचेता कांबळे, अनिता पंधरे, सीमा पैठणकर, शालिनी मेश्राम, मिनू हेडावू, प्रज्ञा कांबळे, पुष्पा नंदनवार, वृंदा खंडारे, करिष्मा समर्थ, मंगला भुरे, शारदा वैद्य, भारती झीलकरवार, नेहा मेटेकर, यामिनी वाट, प्रीती मालवे, ज्योती लिखार, मीनाक्षी चौके, शोभा लिखार, प्रतिभा चनै, हर्षा जैन, शिल्पा चिदंमवार, नीलिमा बाराहाते, ज्योती बनकर, मृदुला वाघ, प्रणाली अहिरकर, दीपा मुजोरिया, अनिता बोरकर, वैशाली बोरकर, अनिता शेंडे, माधुरी पेंदाम, नयना भिसे, संध्या घोडके यांनी परिश्रम केले.

## बार्टी



**पुणे :** बार्टीतील योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे मत बार्टी संस्थेचे महासंचालक सुनिल वारे यांनी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलतांना व्यक्त केले. तसेच त्यांनी बार्टीतील बाहस्त्रोत कर्मचाऱ्यांचे वेतन वाढीबाबत प्रशासकीय पातळीवर कारवाई सुरू असल्याचे सांगून जागतीक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे भारतीय महिलांचे मुक्तीदाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख वृषाली शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रकल्प व्यवस्थापक सारिका थोरात, सुमेध थोरात, नितिन सहारे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. उमेश सोनवणे, रविन्द्र कदम, अनिल कारंडे, दादासाहेब गिते, लेखाधिकारी योगिता झानपुरे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचलन वैशाली खांडेकर यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

## तथागत बुद्ध विहार प्रेरणानगर



**नागपूर :** तथागत बुद्ध विहार समिती प्रेरणानगर येथे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. नाना शेंडे, अतिथी -देवगडे, प्रमुख वक्ते डॉ. सरोज डांगे, अ‍ॅड.स्मिता कांबळे हे होते. महिला दिन साजरा होतो. पण महिलांना डॉ. बाबासाहेबांचा विसर पडतो असे आपल्या वक्तव्यात अ‍ॅड. स्मिता कांबळे यांनी मांडले. तर जागतिक पातळीवर अनेक स्त्रियांनी आपापल्या हक्कांसाठी आंदोलने केली व त्या यशस्वी झाल्या असे वक्तव्य सरोज डांगे यांनी केले. महिला दिनानिमित्त सुनंदा रायपुरे, जयश्री गणवीर, शांता कांबळे, निर्मला गजभिये, सुरेखा शंभरकर, प्रीती तिरपुडे यांना समितीच्या वतीने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सुनंदा रायपुरे यांच्या धम्म वर्गातील चिमुकल्यांनी महापुरुषांच्या जीवनावरील गीते अभिनयाच्या माध्यमातून सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास ढबाले, संचालन रिधिमा लोखंडे व आभार खोब्रागडे यांनी मानले.

## कलावंत विचार मंच



**नाशिक :** जागतिक महिला दिन निमित्ताने कलावंत विचार मंच, कमल फिल्म प्रोडक्शन व कमल म्युझिक मराठी यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार वितरण सोहळा प.सा. नाट्यमंदिर, नेहरू गार्डन शेजारी, शालिमार, नाशिक येथे प्रमुख पाहुणे अभिनेत्री प्रांजली बिरारी नेवसकर, अ‍ॅड. सुवर्णा शेवाळ, अध्यक्ष सुनिल मोंढे यांच्या उपस्थितीत सन्मान महिलांचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यात वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कार डॉ. पुष्पलता इंगळे, नाशिक, कृषी क्षेत्रातील पुरस्कार तारा भाऊसाहेब येळवंडे, अहिल्यानगर, सांस्कृतिक क्षेत्रातील पुरस्कार चारुलता राज पावसेकर, यवतमाळ, सांस्कृतिक क्षेत्रातील पुरस्कार प्रिया प्रमोद दामले, पुणे, सांस्कृतिक क्षेत्रातील पुरस्कार नाट्य कलावंत अंजली विठ्ठल गादे, लातूर, शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार आशा वसंत शिंदे, मुंबई, शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार डॉ. संजीवनी दादाजी जगताप, नाशिक, सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार विजय पोपट जाधव, नाशिक, सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार मंजुषा टेमझरे, अकोला, सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार वैजयंती श्रीकृष्ण सिन्नकर, सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार सविता धनंजय चतुर, नाशिक, सन्मानार्थि साहित्यिक क्षेत्रातील सन्मान दिपाली सोसे, अकोला, कवी क्षेत्रातील सन्मान कवयित्री शैलजा करोडे, मुंबई, नृत्य क्षेत्रातील सन्मान शिल्पा शाहीर, नागपूर, अभिनय क्षेत्रातील सन्मान कल्पना वाढे, पुणे, सामाजिक क्षेत्रातील सन्मान सुनीता भालेकर, मुंबई, सामाजिक क्षेत्रातील सन्मान अ‍ॅड. सोनाली सूर्यवंशी - सोनवणे, नाशिक, सामाजिक क्षेत्रातील सन्मान सुप्रिया रमेश गवळे, नाशिक, अभिनय क्षेत्रातील सन्मान बेबीजान पठाण, पुणे, साहित्यिक क्षेत्रातील सन्मान चैताली वरघट, अकोला, सामाजिक क्षेत्रातील सन्मान क्षितिजा खटावकर, नाशिक यांना प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये सुनिल मोंढे यांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच संचालन वैजयंती सिन्नरकर यांनी केले. आभार लावणी सम्राट शिल्पा शाहीर यांनी मानले.

## काव्यप्रेमी शिक्षक मंच



**नागपूर :** काव्यप्रेमी शिक्षक मंच नागपूर जिल्ह्याने आयोजित केलेला जागतिक महिला दिन बारा तारखेला उत्साहात साजरा झाला. यावेळी कविसंमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन सौरभ पेपरच्या स्तंभलेखिका माधुरी गायधनी दुपटे होत्या, तर उद्घाटक युवा पिढीच्या मार्गदर्शक सपना चोपडे होत्या, प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विजयाताई धोटे होत्या तर बहुजन सौरभ पेपरच्या निवासी संपादिका संध्या राजूरकर व काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या नागपूर जिल्हा अध्यक्ष निशा खापरे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक निशा खापरे यांनी केले. संचालन कोकिळा खोदनकर यांनी केले, तर आभार रेखा सोनारे यांनी मानले. अपर्णा कल्लावार, अर्चना कोहळे, रेखा सोनारे, कोकिळा खोदनकर, सुचिता कुनघटकर यांच्या सहकार्याने महिला दिनानिमित्त संपन्न झालेले कविसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमात हर्षा वाघमारे, विद्या निनावे, डॉ. शील बागडे, प्रणोती कळमकर, वसुधा येनकर, अर्चना चंदनखेडे, वैशाली मुलमुले, शितल बोढे, सुनीता रामटेके, प्रतिभा सहारे, दशरथपंत अतकरी, धर्मराज बोलधने, हरिदास गौतम, श्रद्धा बुरीले, विद्या टोंगसे, यांनी सादरीकरण केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648